MMRC

# कुलाबा-वांद्रे-सीप्झ मुंबई मेट्रो-३ मार्ग

## प्रोजेक्ट मॅनेजर्स ग्लोबल समिट २०२१ मध्ये मुं.मे.रे.कॉ.ला "प्रोजेक्ट एक्सलन्स अवॉर्ड" मिळाला

मुंबई, २४ ऑगस्ट, २०२१ - प्रोजेक्ट मॅनेजर्स ग्लोबल समिट २०२१च्या उद्घाटन समारंभात मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (मुं.मे.रे.कॉ) ला "प्रोजेक्ट एक्सलन्स अवॉर्ड" प्रदान करण्यात आला.

आय.पी.एम.ए. चे सदस्य, प्रोजेक्ट मॅनेजमेंट असोसिएट्स (पी.एम.ए.) इंडियाचे प्रादेशिक संचालक श्री टी. श्रीनिवासन यांनी हा पुरस्कार प्रदान केला. राष्ट्रीय स्तरावर निवडलेल्या एकूण चार प्रकल्पांमध्ये मुं.मे.रे.कॉ.ला हा पुरस्कार मिळाला.

प्रोजेक्ट मॅनेजमेंट असोसिएट्सचा वार्षिक कार्यक्रम या वर्षी व्हर्च्युअल प्लॅटफॉर्म वर आयोजित करण्यात आला. या वर्षी ग्लोबल समिटची थीम ''प्रोजेक्ट मॅनेजमेंट ऑप्टिमायझेशन फॉर रिझिलियन्स अँड सस्टेनेबिलिटी'' होती. २३ आणि २४ ऑगस्ट २०२१ रोजी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. पी.एम.ए. राष्ट्रीय पुरस्कार दरवर्षी चांगल्या प्रकारे राबवल्या जाणाऱ्या प्रकल्पांचे यश आणि कामगिरी साजरा करण्यासाठी आयोजित केला जातो.

"हा पुरस्कार एक सन्मान आहे आणि तो आम्हाला नक्कीच प्रोत्साहन देईल. आधुनिक अभियांत्रिकी प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण करण्यासाठी प्रेरणा देखील देईल",असे मुं.मे.रे.कॉ.चे व्यवस्थापकीय संचालक श्री रणजित सिंह देओल म्हणाले.

यावेळी मुं.मे.रे.कॉ.चे प्रतिनिधित्व करण्यास श्री एस.के. गुप्ता, संचालक (प्रकल्प), श्री ए.ए. भट्ट, संचालक (प्रणाली), श्री अबोध खंडेलवाल, संचालक (वित्त) उपस्थित होते. (समाप्त)

For further information please contact: -

| | |
|---|---|
| Vaidehi More | Niti Tamse |
| 9028543087 | 8369727364/9664215544 |
| vaidehi.more@mmrcl.com | niti.tamse@mmrcl.com |